


# सुगरणी आणि काजवे

गोपिनी करुणाकर | अतानु रॉय यांची चित्रे

कथाचे ३००एम थिंकबुक



एके रात्री काही सोनेरी चिमण्या
प्रकाशासाठी प्रार्थना करण्यासाठी
देवांच्या राज्यात गेल्या.

“देवी, देवी!”, त्या म्हणाल्या,
या सुगरणी.



“बायकांकडे दिवे असतात,
ते त्या लावू शकतात.”



“नागाच्या
फण्यावर खडा असतो.
त्यामुळे त्यांच्या मार्गावर
प्रकाश पडतो.”


“आणि घुबडांना
असलेल्या खास डोळ्यांमुळे
ते रात्री चमकतात.”





“पण आमच्या
घरट्यांमध्ये
फक्त अंधार
असतो. आमची
पिल्लं रात्री
उठतात आणि ती
घाबरतात.”

“कृपया आम्हाला प्रकाश दे!”,
अशी त्यांना प्रार्थना केली.



देवीला सोनेरी चिमण्या आवडल्या. त्यांच्याकडे हसून पाहत ती म्हणाली, “माझ्या छोट्या दोस्तांनो, मी तुम्हाला मदत करेन! मला खात्री आहे, आपण सगळे मिळून काहीतरी उपाय नक्कीच करू शकतो.”



मग सुगरणींनी घोळका केला आणि त्या विचार करू लागल्या.



एका सुगरणीला
एक कल्पना सुचली.



ती म्हणाली, “चंद्र
आकाशाला घासतो
आणि चंद्रधूळ तयार
होते. आणि ही
चंद्रधूळ
काजव्यांच्या रुपात
उडून जाते.



मग? इतरांनी विचारलं. “तर, किती तरी काजवे असतात! आपण काजव्यांना मदत करण्यासाठी विचारलं तर?” ती म्हणाली.

“अरे हो! खरंच की!” बाकीच्यांनी गलका केला.

आकाशातून सुगरणींचा थवा उडाला. सुगरणी आणि देवी काजव्यांकडे मदत मागायला गेल्या.

काजव्यांनी सुगरणींचं
सगळं म्हणणं ऐकून
घेतलं.



ते म्हणाले, “आम्ही
आनंदानं मदत करू.”



“तुमची घरटी मऊ चिखलानं बांधा”, काजवे म्हणाले.

“आम्ही तिथे येऊ आणि त्यांना प्रकाशित करण्यासाठी तिथे राहू. म्हणजे तुमची पिल्लं कधीच अंधारात असणार नाहीत.”

म्हणूनच तेव्हापासून सोनेरी चिमण्यांची घरटी चंद्रधूळ काजव्यांच्या शीतल प्रकाशाने चमकत असतात.



# उपयुक्त किडे

काजव्यांप्रमाणे निसर्गात असे अनेक किडे असतात, जे प्राण्यांना आणि माणसांना मदत करतात.
तुम्ही किड्यांचे वर्णन आणि किड्यांचे नाव यांच्या जोड्या जुळवू शकता?

१. एक गोड पदार्थ तयार करते जो माणूस आणि अस्वलांना सारखाच आवडतो.

२. एक खूप सुंदर दिसणारा किडा जो त्याच्यावरील विशिष्ट ठिपक्यांसाठी ओळखला जातो. शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असतो.

३. हा स्वच्छतेचा भोक्ता असतो. तो विष्ठा गोळा करतो, त्याचे छोटे छोटे गोळे करतो.

४. पिकं नष्ट करणाऱ्या किड्यांना खातो आणि बागेत खूपच उपयुक्त असतो. पण त्याच्या जाळ्यांवर लक्ष ठेवा बरं!

५. हा बहुधा दलदलीजवळ आढळतो. त्याच्याकडे पंखांचे दोन संच असतात आणि सेकंदाला तीनशे वेळा ते फडफडवतो.

कोळी

मधमाशी

चतुर

डंग बिटल

लेडीबग

उत्तरे शेवटच्या पानावर

## चोचवाले मित्र
### सुगरण पक्षाची माहिती :

- सुगरण पक्षी हे विणकर पक्षांच्या प्रजातीतील आहेत.
- ते अत्यंत सामाजिक आणि समूहाने राहणारे पक्षी असतात.
- उत्तर भारतात त्यांना सोनचिडी म्हणतात. सुगरणी या बहुतेक आफ्रिकेमधल्या असतात, पण काही प्रजाती भारत आणि म्यानमारमध्ये आढळतात.
- गवताच्या काड्या आणि पानांपासून हे पक्षी त्यांचे सुंदर घरटे विणतात.
- विणीच्या हंगामात नर पक्षी ही घरटी बांधतो.

## गेट, सेट, ग्लो!
### काजव्यांची माहिती

- काजवे प्रकाशाचा वापर करून एकमेकांशी संवाद साधतात.
- ते शीतल प्रकाशाची निर्मिती करतात आणि हे जगातील सर्वात प्रभावी दिवे असतात.
- काजव्यांच्या प्रत्येक प्रजातीचा स्वतःचा विशिष्ट पॅटर्न असतो.
- केवळ पूर्ण वाढ झालेले काजवेच चमकतात, असे नाही. काही प्रजातींमध्ये अळ्या आणि अंडीसुद्धा प्रकाश उत्सर्जित करतात.
- काजव्यांचे आयुष्य कमी असते.



गोपिनी करुणाकर हे कवी आणि काल्पनिक गोष्टी लिहिणारे लेखक आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील प्रख्यात दिग्दर्शक एन. शंकर यांचे सहाय्यक दिग्दर्शक आहेत. त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध तेलुगू नियतकालिके आणि वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झाल्या आहेत. त्यांना कथाकथन हा प्रकार आवडतो. त्यांच्या आजीकडून हा वारसा त्यांना लाभला आहे. आपल्या लेखनातून याच शैलीचा वापर करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ते म्हणतात, त्यांच्या लेखनाच्या माध्यमातून त्यांच्या लहानपणीच्या स्वप्नांच्या आणि कल्पनांच्या रात्रींच्या आठवणींना ते उजाळा देतात.

गीता धर्मराजन यांनी 'तमाशा' या मुलांसाठी असलेल्या नियतकालिकासह १९८८ साली 'कथा'ची स्थापना केली. शिक्षणक्षेत्रात सामाजिक कार्य करण्याच्या इच्छेने त्यांनी वंचित गटांमधील मुलांसाठी गोष्टींवर आधारीत शिक्षण आणि अभ्यासक्रम विकसित केला. गोष्टी हे त्यांना वैविध्यता दर्शवून एकतेला चालना देण्याचे माध्यम वाटते. त्या पेनिसिल्व्हेनिया विद्यापीठाच्या द पेनिसिल्व्हेनिया गॅझेट या नियतकालिकाच्या संपादकादकांपैकी एक होत्या. त्याचप्रमाणे टारगेट या मुलांसाठीच्या नियतकालिकाच्याही संपादक होत्या आणि या नियतकालिकापासून त्यांच्या ३१ वर्षांच्या व्यावसायिक संपादकीय अनुभवाची सुरुवात झाली. त्यांची ३१ पुस्तके आणि ४०० हून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत.

अतानु रॉय यांच्या नावावर १०० हून लहान मुलांसाठीची पुस्तके आहेत. त्यांची सृजनशीलता त्यांनी बालसाहित्यासाठीच वापरली आहे. बोल्ड रंगांमधून आणि बारीकसारीक तपशीलातून रॉय वाचकांचे हृदय आणि लक्ष वेधून घेतात. एके काळी ते इंडिया टुडेमध्ये राजकीय व्यंगचित्रकार म्हणून काम करत होते. पुस्तकांतील इलस्ट्रेशन्ससाठी चिल्ड्रन्स चॉइस (मुलांची निवड) पुरस्कार आणि इलस्ट्रेशन्ससाठी इबी (IBBY) सन्मानपत्र मिळाले आहे. त्यांचा स्टुडियो गुडगावमध्ये आहे.

## KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

"भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा." - नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ

"कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो."
- चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग

"कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते"
- टाइम आउट

"मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे" - पेपरटायगर्स

**मूळ तेलुगू कथेचा काही भाग गीता धर्मराजन यांनी इंग्लिशमध्ये सांगितला आहे.**

प्रथम आवृत्ती वर्ष २०२१
कॉपीराइट © कथा, २०१२, २०२१
अनुवाद कॉपीराइट © कथा
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

आमचे मिशन : प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!
कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरू नये.
या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.

उत्तरे - १. मधमाशी २. लेडीबग ३. डंग बीटल ४. कोळी ५. चतुर





"आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते!
(विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा)."

कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.

ही सर्व आयएलआर पुस्तके

मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा






































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

“गोष्टींच्या
माध्यमातून
बहुविध भारताची
ओळख.”
- द पायोनिअर

मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
` XXX

इंडिगो सीरिजमध्ये